जिल्हा सल्लागार समितीची बैठक मा. जिल्हाधिकारी यांच्या उपस्थितीखाली दि. २१/१२/२००९ रोजी संपन्न झाली.

## इतिवृत्त :-

__*मुद्दा क्रमांक १ :-*__ जिल्हा उद्योग केंद्राबाबत राबविण्यात येणा-या योजनांचा आढावा.

पंतप्रधान रोजगार निर्मीती कार्यक्रम, बिज भांडवल योजना, जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना व उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम बाबतचा माहे नोव्हेंबर अखेरचा अहवाल सभेपुढे मांडण्यात आला. मा. अध्यक्षांनी स्पष्ट केले कि, जिल्हयात जास्तीत जास्त बेरोजगारांना प्रशिक्षण व कर्ज उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे.
जिल्हयातील प्रत्येक तालुक्यामध्ये सुशिक्षीत बेरोजगारांनसाठी प्रशिक्षण घ्यावे व त्यांना शासकिय कर्ज योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी कार्यवाही करावी.

__*मुद्दा क्रमांक २ :-*__ जिल्हा पुरस्कार योजनेअंतर्गत सन २००९ या वर्षासाठी ६ लघुउद्योजकांनी अर्ज सादर केल्याचे सदस्य सचिव यांनी नमुद केले. या अर्जाची छाननी करुन जानेवारी २०१० मध्ये पुरस्कार वाटपाची कार्यवाही करावी, असे मा. अध्यक्षांनी सुचित केले.

__*मुद्दा क्रमांक ३ :-*__ सन २००८ साठी जिल्हा पुरस्कार वाटप कार्यक्रम मा. जिल्हाधिकारी यांचे हस्ते संपन्न झाला. यामध्ये प्रथम पुरस्कार मे. सोनल इंजिनिअरिंग प्लॅस्टीक फॅब्रीकेटर्स यांना रु. १५०००/- रोख व शाल, श्रीफळ प्रदान करण्यात आले. व्दितीय पुरस्कार मे. सिलीकॉन इंटरनॅशनल प्रोडक्टस् यांना रु. १००००/- रोख व शाल, श्रीफळ प्रदान करण्यात आले.

सदस्य सचिव,
जिल्हा सल्लागार समिती,
तथा महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र, रायगड

अध्यक्ष, जिल्हा सल्लागार समिती
तथा जिल्हाधिकारी,
रायगड-अलिबाग.

स्थानिक उमेदवारांना नोकरीमध्ये प्राधान्याने समाविष्ट करुन घेण्यासाठी जिल्हा समन्वय समितीची बैठक दिनांक २१/१२/२००९ रोजी मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

## इतिवृत्त :-

मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्षांनी जिल्हयातील औद्योगिक घटकांना आवाहन केले कि, स्थानिक लोकांना नोकरीमध्ये प्राधान्याने समाविष्ट करुन घेण्यासाठी उद्योजकांचे सहकार्य अपेक्षित आहे. शासनाने विहीत केलेल्या मापदंडानुसार पर्यवेक्षकिय श्रेणीत किमान ५० % व पर्यवेक्षकियसहित इतर श्रेणीत ८० % स्थानिक कर्मचारी नियुक्ती करणे बंधणकारक आहे. नोकर भरती करणारा अधिकारी मराठी जाणणारा असावा. यासाठी प्रस्तावित उद्योग घटकाने स्थालोरो-२ ची माहिती व प्रस्तापित उद्योग घटकाने स्थालोरो-२ मध्ये माहिती द्यावी. स्थानिक उमेदवारांना योग्य ते कौशल्य नसल्यास त्याबाबत आय.टी.आय. किंवा इतर प्रशिक्षण संस्थामध्ये त्यांना प्रशिक्षीत करणे गरजेचे आहे.

सदस्य सचिव यांनी नमूद केले की, रायगड जिल्हयातील मे. भूषण स्टिल ॲन्ड स्ट्रीप लि. व मे. हनिल ईरा लि. ता. खालापूर या प्रस्थापित उद्योग घटकांनी पाठपुरावा करुन सुध्दा स्थालोरो-१ ची माहिती दिलेली नाही. याबाबत मा. अध्यक्षांनी सुचित केले कि, या घटकांना त्यांचे सहीचे अर्धशासकिय पत्राव्दारे माहिती देण्याविषयी लेखी कळविण्यात यावे.

मे. रुबी मिल्स लि. ता. खालापूर या प्रस्थापित उपक्रमाचे उपस्थित महाव्यवस्थापक श्री. मेहता यांनी त्यांचे नियोजित उद्योग घटकामध्ये स्थानिक उमेदवारांना सामावून घेण्यासाठी केलेल्या कार्यवाहीचा आढावा दिला. त्यांनी राज्यातील ६ उमेदवारांची निवड केलेली आहे. उपक्रम चालविण्यासाठी एकूण १६ उमेदवारांची आवश्यकता आहे असे त्यांनी स्पष्ट केले. स्थालोरो-२ प्रमाणपत्र सादर करण्यासाठी त्यांना सभेमध्ये निदर्शनास आणून दिले.

सदस्य सचिव,
जिल्हा समन्वय समिती,
तथा महाव्यवस्थापक,
रायगड-अलिबाग.

अध्यक्ष, जिल्हा समन्वय समिती
तथा जिल्हाधिकारी,
रायगड-अलिबाग.

## मा. जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांचे अध्यक्षतेखाली दि.२१.१२.२००९ रोजी जिल्हा उदयोग मित्र समितीचे इतिवृत्त .

| अ. क्र. | मुद्दा उपस्थित केलेल्या संघटनेचे/संस्थेचे/उद्योग घटकाचे नांव | उपस्थित मुद्दे/ विषय | संबंधित संस्था/ कार्यालयाचे नांव | घेतलेला निर्णय |
|---|---|---|---|---|
| ०१ | सदस्य सचिव, जिल्हा उ्द्योग मित्र, रायगड | दिनांक ०७.०७.२००९ रोजी झालेल्या जिल्हा उद्योग मित्र सभेचे इतिवृत्तास मान्यता देण्यात आली. | | |
| ०२. | महाड औद्योगिक संघटना | १ रस्त्यावरचे पथदिप दुरुस्ती व नवीन बसविणे<br>२. रस्त्यांची दुरुस्ती व देखभाल<br>३. पावसाळ्यातील पाण्याचा निचरा होणे<br>४.ड्रेनेजच्या दोन्ही बाजुला आरसीसीचे गटार तयार करणे<br>५. ट्रक टर्मिनस करणेबाबत<br>६. कारखानदारांचे नावांचे डिस्प्ले बोर्ड औद्योगिक क्षेत्रात उभारणे<br>७.घनकच-याचे विल्हेवाट लावणे.<br>८. अतिक्रमण हटविणे | कार्यकारी अभियंता, एमआयडिसी , महाड | **मुद्दा क्र.-** १,२,३ व ४ मुद्दयां संदर्भात प्रशासकिय मान्यता मिळाल्याचे एम.आय.डी.सी.च्या उपस्थित अधिका-याने सांगितले. मा. अध्यक्षांनी ही कामे पावसाळ्याच्या आत पूर्ण झाली पाहिजेत व कामाचा दरमहा प्रगती अहवाल समितीस देण्यात यावा असे सुचित केले.<br><br>**मुद्दा क्र.-** ५ मुद्दयाबाबत असोसिएशन च्या माध्यमातून ट्रक टर्मिनल्स उभारणीबाबत प्रस्ताव आल्यास प्रशासकिय मान्यतेसाठी एम.आय.डी.सी.च्या मुख्य कार्यालयास पाठविण्यात येईल असे संबंधित अधिका-यांनी सांगितले. मा. अध्यक्षांनी सुचित केले की, जिल्हा उद्योग मित्र सभेचा संदर्भ देऊन प्रस्ताव पाठविण्यात यावा.<br><br>**मुद्दा क्र.-** ७ बाबत औदयागिक घनकच-याचे विल्हेवाट चांगल्या पध्दतीने होत आहे असे अधिका-यांनी स्पष्ट केले.<br><br>**मुद्दा क्र.-** ८ बाबत एम.आय.डी.सी.ने पुढाकार घेऊन अतिक्रमण परिसरामध्ये जे व्यवसाय अथवा सेवा सुरु आहेत त्यांचेसाठी लहान भूखंड किंवा शेड तयार करुन त्यांना योग्य ठिकाणी पुर्नवसन करुन दिल्यास अतिक्रमण होणार नाही. याबाबत एम.आय.डी.सी ने कार्यवाही करावी असे मा. अध्यक्षांनी सुचित केले. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०३. | पाताळगंगा व रसायनी औद्योगिक संघटना | १.एमआयडिसी क्षेत्रातील रस्त्याची दुरुस्ती<br>२. हॅलिपॅड बांधणे ,<br>३. वेलफेअर सेंटर उभारणे | कार्यकारी अभियंता , एमआयडिसी , अलिबाग | **मुद्दा क्र. -** १ बाबत कार्यकारीअभियंता, एमआयडीसी अलिबाग यांनी नमूद केले की, या कामासाठी टेंडरची कार्यवाही सुरु आहे व तीन महिन्यात काम पुर्ण होईल. असोसिएशनच्या पदाधिका-यांनी नमुद केले की डांबरी रस्ते लवकर खराब होतात व त्यावर पुन्हा पुन्हा काम करणे गरजेचे असते. त्याऐवजी सिमेंट रस्ते तयार करावेत जेणेकरुन उद्योजकांना हा त्रास होणार नाही. मा. अध्यक्षांनी ही बाब तपासून घ्यावी असे सुचित केले आहे.<br><br>**मुद्दा क्र.-** २ बाबत एम.आय.डी.सीृ क्षेत्रात हेलिपॅडची आवश्यकता आहे. तांत्रिक व आर्थिक क्षमता एमआयडीसीने तपासून त्याचा अहवाल पुढील सभेत सादर करावा.<br><br>**मुद्दा क्र.-** ३ बाबत सन १९९५ मध्ये वेलफेअर बोर्डाला वेलफेअर सेंटर उभारणीसाठी भूखंड वाटप केला आहे. तथापी बोर्डाने आजतागायत वेलफेअर सेंटर सुरु केलेले नाही. मा. अध्यक्षांनी सुचित केले की, पुढील सभेत वेलफेअर बोर्डाचे जबाबदार अधिका-यांना सदयस्थिती अहवालासहित सभेत आमंत्रित करावे. |
| ०४ | खोपोली औदयोगिक संघटना | १. खोपोली औदयोगिक वसाहती पासून बायपास रोड करणे बाबत | कार्यकारी अधिकारी, नगरपालिका खोपोली | नगर पालिकेचे उपस्थित अधिका-यांनी नमूद केले की, नगर पालिकेने बिओटी तत्वावर बायपास रोड तयार करण्याचे प्रस्तापित केले आहे व ते काम प्रगतीपथावर आहे. मा. अध्यक्षांनी सुचित केले की, हे काम तात्काळ होण्यासाठी नगर पालिकेने कार्यवाही करावी. याबाबतचा मासिक प्रगती अहवाल नगरपालिकेने समितीस दयावा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०५ | सुप्रिम पेटोकेम लि. रोहा | १.मौजे वागणी गावाजवळ मोरीलगत असलेले बांधकाम त्वरीत करुन घेणे.<br><br>२. वागणी नागोठणे जिल्हापरिषद रोड-१२५ चे दुरुस्तीबाबत<br><br>३.सुप्रिम पेटोकेम लि.व ग्रामपंचायत वांगणी यांचेमध्ये ठोक कराराबाबत नव्याने फेर मोजणी | कार्यकारी अभियंता, सा.बां. महाड.<br><br>कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद रायगड उप कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) जिल्हा परिषद, रायगड | **मुद्दा क्र. - १** बाबत मा. अध्यक्षांनी सुचित केले की, सार्वजनिक बांधकाम, महाड यांनी हे काम त्वरीत हातामध्ये घ्यावे व पावसाळ्यापूर्वी काम पुर्ण होईल याची दक्षता घ्यावी.<br>**मुद्दा क्र. - २** बाबत प्रस्ताव तयार केला आहे. अधिक्षक अभियंता यांचे स्तरावर प्रस्ताव विचाराधीन आहे. मा. अध्यक्षांनी सुचित केले की, पाठपुरावा करुन काम पुर्ण होईल याची दक्षता घ्यावी.<br>**मुद्दा क्र. - ३** बाबत जिल्हा परिषदेचे उपस्थित अधिका-यांनी नमूद केले की, प्रस्ताव तयार केलेला आहे व वरिष्ठ पातळीवर प्रकरण विचाराधीन आहे. मा. अध्यक्षांनी याबाबत त्वरीत कार्यवाही व्हावी असे सुचित केले. |
| ०६ | तळोजा मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन | १.टेक्नोव्हा कंपनी ते पेंढार फाटा व पनवेल बायपास ते पोलीस स्टेशन तळोजा या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत व दुभाजक बसविणे<br>२. पथदिवे दुरुस्ती<br>३. घनकचरा व्यवस्थापना बाबत | कार्यकारी अभियंता एमआयडीसी अलिबाग. | **मुद्दा क्र. - १ व २** बाबत कार्यकारी अभियंता, अलिबाग यांनी नमुद केले की, टेंडर कार्यवाही सुरु आहे. रस्ता दुरुस्ती, दुभाजक बसविणे व पथदिवे दुरुस्ती याचे एकत्रित टेंडर काढण्यात आले आहे. तसेच टेक्नोव्हा कंपनी ते पेंढार फाटा व पनवेल बायपास चे कॉंक्रीटीकरणाचे काम सुरु आहे. मा. अध्यक्षांनी या कामाचा वेग वाढविण्यात यावा जेणे करुन पावासाळ्यापूर्वी कामे पुर्ण होतील असे सुचित केले.<br>**मुद्दा क्र. - ३** बाबत कारखान्यांनी त्यांच्या परिसरातील घनकचा-याची विल्हेवाट औदयागिक संघंटनांनी पुढाकार घेऊन विल्हेवाट लावण्याची यंत्रणा उभारावी. यामुळे परिसर स्वच्छ राहिल. एमआयडीसी क्षेत्रातील परिसर हा औदयोगिक उपक्रमाचा भाग आहे हि भावना ठेवून परिसर स्वच्छ ठेवणे, अशी सुचना मा. अध्यक्षांनी दिली.<br>असोसिएशनच्या पदाधिका-यांनी तळोजा एम.आय.डी.सी. क्षेत्रात चोरीचे प्रकरण वाढले आहेत व याबाबत परिसरात पोलिस पेट्रालिंग वाढवावे असे नमूद केले. मा. अध्यक्षांनी जिल्हयाचे पोलिस अधिक्षक यांना याबाबत कळविण्यात येईल असे सुचित केले. चोरीला आळा घालण्यासाठी कारखानदारांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन मा. अध्यक्षांनी केले. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | सदर क्षेत्रातील उद्योजक | शासनाने विळेभागाड औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास जमीन उपलब्ध करुन दिलेली आहे या औद्योगिक क्षेत्राची प्रगती म्हणजेच मुलभूत सुविधा, भूखंड वाटप, बांधकाम सुरु केलेल्या कारखान्यांची संख्या, उत्पादनात गेलेल्या कारखान्यांची संख्या व इतर अनुषंगीक कामाबाबत आढावा | प्रादेशिक अधिकारी एमआयडीसी, पनवेल. | प्रादेशिक अधिकारी एमआयडीसी पनवेल यांनी नमूद केले की, विळे-भागाड औदयागिक क्षेत्रात एकुण ४२१ भूखंड आहेत. त्यापैकी ३४४ उद्योग घटकांनी ॲग्रीमेंट केले आहे. २२ उद्योजकांनी बांधकाम सुरु केले आहे. मा. अध्यक्षांनी याबाबत स्पष्ट केले कि, मुलभूत सुविधा म्हणजेच रस्ते, पाणी व वीज एमआयडीसीने उपलब्ध न करुन दिल्याने उद्योजकांचा निरोत्साह आहे. उपस्थित अभियंता यांनी फेज १ मध्ये रस्ते व पाईपलाईनचे काम चालू आहे असे सांगितले व फेज २ चे बाबत टेंडर कार्यवाही सुरु आहे. मा. अध्यक्षांनी सुचित केले की, एमआयडीसीने या कामामध्ये वेग वाढवावा व याचा मासिक अहवाल समितीस दयावा. |
| ८ | आयत्यावेळचे विषय | इंडस्ट्रियल सेफ्टी ऑडीट बाबत | | जयपूर येथील सितापूर औद्योगिक वसाहतीमध्ये भारतीय तेल महामंडळाच्या डेपोला भीषण आग लागल्याने मनुष्य व वित्तहानी मोठया प्रमाणावर झाली. अश्याप्रकारची दुर्घटना होऊ नये म्हणून रासायनिक/रासायनिक प्रक्रीया करणा-या औद्योगिक घटकांनी इंडस्ट्रियल सेफ्टी ऑडीट करुन घेणे बंधनकारक आहे. मा. अध्यक्षांनी याबाबत रायगड जिल्हयातील अश्याप्रकारच्या औद्योगिक घटकांना व औद्योगिक संघटकांना दि. ३०/११/२००९ रोजी पत्र देवूनसुध्दा योग्य प्रतिसाद मिळालेला नाही, यासाठी दि. २५/०१/२०१० चे आत सर्वांनी इंडस्ट्रिय सेफ्टी ऑडीट करुन घ्यावे अन्यथा दंडात्मक कार्यवाही करणे क्रमप्राप्त होईल असे सुचित केले.<br>जिल्हा उद्योग केंद्राने याबाबत जिल्हयातील सर्व औद्योगिक संघटनांना हि बाब लेखी अवगत करावी असे मा. अध्यक्षांनी सुचित केले. |

सदस्य सचिव,
जिल्हा उद्योग मित्र
तथा महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र, रायगड-अलिबाग.

अध्यक्ष, जिल्हा उद्योग मित्र समिती
तथा जिल्हाधिकारी,
रायगड-अलिबाग.